PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chandanachi Choli Ang Ang Jali
Year: 1975

Song: Ain Unhacha Tadka Hota

Lyricist: Jagdish Khebudkar

ऐन उन्हाचा तडका होता
वळीव आला भरून
बांधा वरनं होते निघाले
हात आडवा धरून
वाटाडीनं बेजार केलं
असा धिंगाणा करून
गं बाई बाई बाई
असा धिंगाणा करून
गं बाई बाई बाई
आगं काय झालं
माझ्या डोळ्यात कचरा गेला
माझ्या डोळ्यात कचरा गेला
कुणी येऊन फुंकर घाला या ना
कुणी येऊन फुंकर घाला
अगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा
गेला गेला गेला
अशी नागमोडी वाट
जसा वळणाचा घाट
कसा वारा बी सुटलाय मेला
कसा वारा बी सुटलाय मेला
हिच्या डोळ्यात आगं बाई
हिच्या डोळ्यात कचरा गेला

दिवसा ढवळ्या धुरळा उडला
डावा डोळा मी आपसुक मिटला
दिवसा ढवळ्या धुरळा उडला
डावा डोळा मी आपसुक मिटला
त्या द्वाडानं
काय गं केलं
भलताच त्यानं अर्थ काढला
येगळा इशारा केला
अगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा गेला
कुणी येऊन फुंकर घाला
अगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा
गेला गेला गेला
अशी नागमोडी वाट
जसा वळणाचा घाट
कसा वारा बी सुटलाय मेला
कसा वारा बी सुटलाय मेला
हिच्या डोळ्यात आगं बाई
हिच्या डोळ्यात कचरा गेला

मर्द गडी पर दिसला छकडा
हसून पिळला मिशीचा आकडा
मर्द गडी पर दिसला छकडा
हसून पिळला मिशीचा आकडा
त्या द्वाडानं
काय गं केलं
दोन्ही हातानं धरला मुखडा
कसंच झालं मला
अगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा गेला
कुणी येऊन फुंकर घाला

PlanetRead

Literacy for a Billion

अगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा
गेला गेला गेला
अशी नागमोडी वाट
जसा वळणाचा घाट
कसा वारा बी सुटलाय मेला
कसा वारा बी सुटलाय मेला
हिच्या डोळ्यात आगं बाई
हिच्या डोळ्यात कचरा गेला

लई जोरानं त्यानं फुकलं
व्हटावरी व्हट त्याचं झुकलं
लई जोरानं त्यानं फुकलं
व्हटावरी व्हट त्याचं झुकलं
त्या द्वाडाचं
काय गं झालं
त्याचं बी चुकलं माझं बी चुकलं
गडबड घोटाळा झाला
माझ्या डोळ्यात कचरा गेला
का गं पुन्हा का थांबलीयास
माझ्या डोळ्यात कचरा गेला
कुणी येऊन फुंकर घाला या ना
कुणी येऊन फुंकर घाला
आगं बाई
माझ्या डोळ्यात कचरा
गेला गेला गेला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*